MHAH120015512025

**<u>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोपरगाव, जि.अहमदनगर</u>**
**<u>यांच्या न्यायालयात</u>**

(पिठासीन अधिकारीः– वाय. जे. तांबोळी)

**निकाल दिनांकः– ०८.०५.२०२६**

**<u>नियमीत फौजदारी खटला क्र. ३४५/२०२५.</u>**
**<u>नि.क्र.–३६.</u>**

गु.र.क्र. १३६/२०२५, तालुका पोलीस स्टेशन, कोपरगाव, जि. अहमदनगर.

| | | |
|---|---|---|
| **<u>अभियोग पक्ष</u>** | | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत ठाणे अंमलदार,<br>तालुका पोलीस स्टेशन,<br>ता. कोपरगाव, जि. अहमदनगर. |
| **<u>सहा.सरकारी अभियोक्ता</u>** | | श्री. एस. जी. गाढवे. |
| **<u>आरोपीं</u>** | | १. बाळु विलास सुपेकर,<br>वय– २८ वर्षे, धंदा– मजुरी,<br>२. विलास बबन सुपेकर,<br>वय– ५६ वर्षे, धंदा– मजुरी,<br>३. लक्ष्मी विलास सुपेकर,<br>वय– ५२ वर्षे, धंदा– शेती,<br>४. मनोज विलास सुपेकर,<br>वय– ३२ वर्षे, धंदा– शेती,<br>५. संगिता मनोज सुपेकर,<br>वय– २६ वर्षे, धंदा– घरकाम,<br>६. प्रसाद विलास सुपेकर,<br>वय– ३० वर्षे, धंदा– शेती,<br>७. सविता प्रसाद सुपेकर,<br>वय– २४ वर्षे, धंदा– घरकाम, |

| | | |
|---|---|---|
| | | सर्व आ. रा.  वारजे माळवाडी,<br>शिवाजी चौक टॉवर लाईन जवळ, पुणे. |
| **<u>आरोपीकरीता विधिज्ञ</u>** | | श्री. के. डी. शिरोडे |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ३०/०१/२०२३ ते १७/०८/२०२४ |
| गुन्हा नोंदविल्याची तारीख | ०७/०५/२०२५. |
| दोषारोप दाखल तारीख | २६/०८/२०२५. |
| आरोपींविरुध्द दोषारोप ठेवल्याची तारीख | १३/११/२०२५. |
| पुरावा प्रारंभाची तारीख | १७/०३/२०२६. |
| निकाल राखीव तारीख | ०८/०५/२०२६. |
| निकाल तारीख | ०८/०५/२०२६. |
| कालावधी | ०० व. ०८ म. १३ दि. |

## <u>आरोपींचा तपशील</u>

| आरोपीचा क्रमांक | आरोपींचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सुटल्याची तारीख | दोषारोपाचे कलम | दोषी किंवा निर्दोष | शिक्षेचा तपशील | अटकेत असल्याचा कालावधी, कलम ४२८ फौ. प्र.सं. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | बाळु विलास सुपेकर | समज दिली. | १३.११. २०२५ | कलम ४९८-अ, ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ भा.दं.वि. | निर्दोष | निरंक | निरंक |
| २. | विलास बबन सुपेकर | | | | | | |
| ३. | लक्ष्मी विलास सुपेकर | | | | | | |
| ४. | मनोज विलास सुपेकर | | | | | | |
| ५. | संगिता मनोज सुपेकर | | | | | | |
| ६. | प्रसाद विलास | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | सुपेकर | | | | | | |
| **७.** | सविता प्रसाद सुपेकर | | | | | | |

## अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालय साक्षीदार यांची यादी.

### अ-अभियोग पक्ष

| अनुक्रमणिका क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | कार्तिकी बाळु सुपेकर | फिर्यादी |
| २. | रामदास नाना वायकर | साक्षीदार |

**ब-आरोपींतर्फे साक्षीदार- नाही.**

**क-न्यायालया साक्षीदार- नाही.**

**अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालय निशाणींची यादी.**

### अ- अभियोग पक्ष-

| अनुक्रमणिका क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | | |

### ब-आरोपी पक्ष-नाही.

### क-न्यायालयात प्राप्त निशाणी-

| अनुक्रमणिका क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| **१.** | ३३ | तडजोड पुरसिस |
| **२.** | ३५ | पुरावा बंद पुरसिस |

### ड-मुद्देमाल.

| अनुक्रमणिका क्रमांक | मालमत्ता/निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**न्यायनिर्णय**

(जाहीर दिनांकः– ०८.०५.२०२६)

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४९८–अ, ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ अन्वये खटला चालविण्यात आला.

२) अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादी हिचा विवाह आरोपी क्र. १ सोबत दिनांक ३०–०१–२०२३ रोजी झाला होता. लग्नानंतर ती तिच्या सासरी वारजे माळवाडी, शिवाजी चौक टॉवर लाईन जवळ, पुणे येथे नांदण्यास गेली होती. लग्नानंतर काही दिवस आरोपींनी फिर्यादीला व्यवस्थित नांदविले. त्यानंतर आरोपींनी तिला शिवीगाळ व मारहाण करुन तिचा मानसिक व शारिरिक छळ केला. म्हणून तिने आरोपींविरुध्द कोपरगाव तालुका पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंदवली.

३) सदरच्या तक्रारीनूसार आरोपींविरुध्द गु.र.क्र. १३६/२०२५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्हयाचा तपास पो. हे. कॉ. श्री. एम. बी. दहिफळे यांच्याकडे देण्यात आला. त्यांनी त्यांच्या तपासात फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १६१ अन्वये साक्षीदारांचे जबाब नोंदविले. घटनास्थळाचा व जप्ती पंचनामा केला. अटक पंचनामा केला. आरोपींविरुध्द पुरेसा पुरावा मिळाल्याने तपासाअंती त्यांनी भारतीय दंड विधान कायदा, १८६० चे कलम ४९८– अ, ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

४) प्रकरणाची सुचना मिळाल्यानंतर आरोपी हे प्रकरणामध्ये हजर झाले.

न्यायालयाने त्यांना जामीनावर सोडले. आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कायदा, १८६० चे कलम ४९८– अ, ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप निशाणी १७ वर निश्चित केले. तसेच आरोपींनी निशाणी १८ ते २४ नुसार गुन्हा नाकबुल करुन संपरिक्षेची तयारी दर्शविली.

५) आरोपीं व फिर्यादी यांनी त्यांच्यामधील वाद मिटलेबाबत निशाणी ३३ नुसार पुरसिस दाखल केली आहे. तसेच फिर्यादीने निशाणी ३५ नुसार इतर कोणताही पुरावा नोंदवण्याचा नाही अशी पुरावा बंद पुरसिस दाखल केलेली आहे. आरोपींविरुध्द गुन्हादर्शकस्थिती नसलेने फौजदारी प्रक्रिया संहिता कायदा कलम ३१३ (१) (ब) अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

६) अभियोग पक्षातर्फे विव्दान सहा.सरकारी वकील श्री. एस. जी. गाढवे व आरोपीतर्फे विव्दान वकील श्री. के. डी. शिरोडे यांचा युक्तिवाद ऐकला.

७) उभयपक्षांच्या वतीने करण्यात आलेला परस्पर विरोधी युक्तिवाद व उभय पक्षांची विरोधी कथने विचारात घेता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात व त्यावर मी माझ्या कारणमिमांसेसह निष्कर्ष देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक ३०–०१–२०२३ ते १७–०८–२०२४ चे दरम्यान वारजे माळवाडी, शिवाजी चौक टॉवर लाईन जवळ, पुणे येथे राहत्या घरी आरोपींनी फिर्यादीला व्यवस्थित नांदविले. त्यानंतर आरोपींनी तिला शिवीगाळ व मारहाण करुन तिचा मानसिक व | **नकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| | शारिरिक छळ करुन गुन्हयाचे कृत्य केले ? | |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.१ करीता</u> :**

८) आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने केवळ दोन साक्षीदार म्हणजेच फिर्यादी कार्तिकी आणि साक्षीदार रामदास यांची साक्ष नोंदवलेली आहे. फिर्यादी कार्तिकी हिने तिच्या पुराव्यात असे कथन केले की, ती आरोपींना ओळखते. आरोपी क्र.१ हा तिचा पती असून उर्वरित आरोपी हे त्याचे नातलग आहे. लग्नानंतर तिचा व आरोपींचा किरकोळ कारणावरुन वाद होत होता. त्यामुळे तिने गैरसमजुतीतुन आरोपींविरुध्द तालुका पोलीस स्टेशन कोपरगाव येथे फिर्याद दिली होती. पुढे तिने तक्रारीतील मजकूर तिला मान्य नसल्याचे कथन केले आहे. सदरील साक्षीदार ही फितुर झाल्यामुळे तिला विचारण्यात आलेल्या सुचक प्रश्नांच्या अनुषंगाने तिने अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. असे असुनही, तिने तिच्या उलटतपासादरम्यान तिचा व आरोपींचा वाद मिटलेला असून तशी तडजोड पुरसिस निशाणी ३३ नुसार दाखल असून त्या तडजोड पुरसिसवर फिर्यादीची स्वाक्षरी व आरोपींची स्वाक्षरी असल्याचे मान्य केले आहे.

९) साक्षीदार क्र.२ रामदास यांच्या पुराव्यात असे आले आहे की, आरोपी क्र.१ हा त्यांचा जावई असून उर्वरित आरोपी हे त्यांचे नातलग आहेत. फिर्यादीचा व आरोपींचा किरकोळ कारणावरुन वाद होत होता. या व्यतिरिक्त काहीही घडले नव्हते. सदरील साक्षीदार हे फितुर झाल्यामुळे त्यांना विचारण्यात आलेल्या सुचक प्रश्नांच्या अनुषंगाने अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. असे असुनही, त्यांनी त्यांच्या उलटतपासादरम्यान त्यांचा व आरोपींचा वाद मिटलेला असून तशी तडजोड पुरसिस निशाणी ३३ नुसार दाखल असल्याचे मान्य केले आहे. पुढे त्यांनी नि.क्र.३५ नुसार पुरसिस दाखल करुन त्यांना इतर कोणतेही साक्षीदार नोंदावयाचे नसल्याचे कळविले.

१०) उपरोक्त नमुद पुराव्याच्या अनुषंगाने प्रकरणातील फिर्यादी व आरोपी यांचा वाद सामंजस्याने मिटला असल्याचे दिसते. त्यामुळे उभय पक्षकारांमधील वाद तडजोडीने मिटत असेल तर आरोपींविरुध्द प्रकरण चालवून अनावश्यक व अनाठायी वाद निर्माण करण्याची काही आवश्यकता नाही.

११) अभियोग पक्षाने फिर्यादी व एका साक्षीदारा व्यतिरिक्त इतर साक्षीदारांची साक्ष नोंदविली नाही. तसेच ज्या साक्षीदारांची साक्ष नोंदविली त्या नुसार आरोपींच्या विरोधात दाखल झालेल्या दोषारोपपत्रा अन्वये कोणतीही गुन्हादर्शक परिस्थिती अभिलेखावर दाखल नाही. करीता मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करीता</u>:–**

१२) कायदयाचा उद्देश हा समाजामध्ये शांतता व सुव्यवस्था असावी हाच आहे. एखाद्या व्यक्तीस दोषी धरणे त्यास शासन करणे हा कायद्याचा उद्देश नसतो. कायद्याच्या आधारे समाजामध्ये सामंजस्याचे वातावरण निर्माण व्हावे अशी अपेक्षा समाजाची असते. त्याकरीता न्यायालयीन प्रणाली तयार करण्यात आलेली आहे. प्रस्तुत प्रकरणात उभय पक्षाच्या इच्छेचा देखील निश्चित न्यायनिर्णयाप्रत येण्याकरीता विचार करणे आवश्यक आहे. अभियोग पक्षाने आरोपींवर ज्या भारतीय दंड विधान कायद्याच्या अंतर्गत दोषारोपपत्र दाखल केलेले आहे, त्या अनुषंगिक घटक हे पुराव्यानिशी सिध्द झालेले नसल्यामुळे आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतात.

१३) प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये मुळ फिर्यादी व आरोपीं यांच्यामध्ये पुरसीस ३३ नुसार तडजोड झालेली आहे. त्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ नुसार आरोपींना जामीन देण्याचे आदेशीत न करता फक्त वैयक्तिक बंधपत्रावर सोडणे उचित ठरते. सबब, मुद्दा क्र.२ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम **२४८ (१)** अन्वये आरोपी क्रमांक १. बाळु विलास सुपेकर, २. विलास बबन सुपेकर, ३. लक्ष्मी विलास सुपेकर, ४. मनोज विलास सुपेकर, ५. संगिता मनोज सुपेकर, ६. प्रसाद विलास सुपेकर आणि ७. सविता प्रसाद सुपेकर यांची भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४९८– अ, ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे जामीनपत्र व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कायदा, १९७३ चे कलम ४३७–अ अन्वये रुपये १५,०००/– चे प्रत्येकी वैयक्तिक बंधपत्र दाखल करावे. सदर वैयक्तिक बंधपत्र सहा महिन्यापर्यंत अस्तित्वात राहिल.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

YOUNUS JAFAR TAMBOLI

Digitally signed by YOUNUS JAFAR TAMBOLI
Date: 2026.05.08 17:03:10 +0530

दिनांकः ०८/०५/२०२६.
कोपरगाव.

( वाय. जे. तांबोळी )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोपरगाव,
**जि. अहमदनगर.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Shri. S. B. Khedkar,<br>Stenographer Grade-III, |
| Court | : | Shri. Y. J. Tamboli,<br>Judicial Magistrate First Class,<br>Kopargaon, Dist. Ahmednagar. |
| Judgment delivered on | : | 08.05.2026. |
| Judgment signed by the presiding officer on | : | 08.05.2026. |